# जीवनसातत्यासाठी शिक्षण

**शैक्षणिक**

फ्रिज्यो काप्रा, पीटर बकले आणि त्यांचे सहकारी यांनी 'सेंटर फॉर इकोलिटरसी' या नावाची एक संस्था, दहा वर्षांपूर्वी, सानफ्रान्सिस्को (अमेरिका) येथे सुरू केली. 'इकोलिटरसी' ही संज्ञा प्रथमतः डेव्हिड ऑर यांनी 'इकॉलॉजिकल लिटरसीः एज्युकेशन ॲन्ड ट्रान्झिशन टू अ पोस्टमॉडर्न वर्ल्ड' या आपल्या ग्रंथात वापरली आहे. या संस्थेच्या कार्यप्रेरणेतून अनेकांनी आपल्या शाळांतून 'पर्यावरणकेंद्री' शिक्षण द्यायला सुरूवात केली आहे. या सेंटरने केलेल्या शिक्षणविषयक कार्यामधून जी संकल्पना आकाराला आली आहे, तीला 'चिरायू जीवनरचनांचे शिक्षण' (एज्युकेशन फॉर सस्टेनेबल पॅटर्न्स ऑफ लिव्हिंग) असे म्हटले जाते. या शिक्षणामागचा दृष्टिकोण हा अनुभवाधारित, सहभागी आणि विविध शास्त्रांवर आधारित अशा पर्यावरणसाक्षरतेचा आहे.

'रिसर्जन्स' (ऑक्टोबर २००४) मासिकातील आपल्या लेखात फ्रिजो काप्रा यांनी, 'चिरायू जीवनरचनांच्या शिक्षणा'ची संकल्पना शास्त्रीय अंगाने स्पष्ट केली आहे. तसेच या संकल्पनेत अनूस्यूत असलेला चिरायूजीवन किंवा जीवनसातत्य व पर्यावरण यांमधील परस्परसंबंध स्पष्ट केला आहे. पर्यावरणीय जीवनसातत्याची संकल्पना, सुमारे वीस वर्षांपूर्वी लेस्टर ब्राउन यांनी मांडली. त्यांनी त्याची व्याख्याही दिली आहे. "चिरायू समाज म्हणजे असा समाज की जो, आपल्या भावी पिढयांच्या जीवनसंधी कमी न करता आपल्या गरजा भागवतो;" अशाप्रकारची ही व्याख्या आहे. परंतु, ही गोष्ट घडवून कशी आणायची याबाबतचे काहीही सूचना ही व्याख्या करीत नाही. त्यामुळे ही व्याख्या गृहीत मानून त्यावर आधारित कृतिशील व्याख्या करण्याचा प्रयत्न काप्रा आणि मंडळींनी केला आहे.

काप्रा यांचे म्हणणे असे की, चिरायू समाजाची संकल्पना काही आपल्याला नव्याने शोधण्याची गरज नाही. अगदी शून्यापासून सुरूवात करण्याची गरज नाही. कारण, निसर्गातच असे चिरायू समुदाय अस्तित्वात आहेत. ते वृक्षवेलींचे आहेत, प्राण्यांचे आहेत किंवा अगदी सूक्ष्म जीवजिवाणूंचेही आहेत. त्यांचा अभ्यास केला तर असे लक्षात येते की, जीवनसातत्य हेच त्यांचे वैशिष्टय आहे. त्यामुळे आपण जर आपली, म्हणजे मानवाची सारीच जीवनव्यवस्था -आपले जीवन विषयक दृष्टिकोण, अर्थरचना, उद्योग, तंत्र इ. सर्व-या पर्यावरणीय जीवनसातत्यावर आघात होणार नाही या पद्धतीने आखले तर आपण एक चिरायू असा मानवसमाज घडवू शकू.

अशा पद्धतीने चिरायू समाजाची जडणघडण करायची असेल तर, अर्थातच, आपल्याला निसर्गव्यवस्थेतील चिरायू समुदायांची संघटना नीटपणे समजून घ्यावी लागेल. या समुदायांमध्ये परस्परावलंबी असे जीवनजाल कसे बांधले आहे याचे आकडू करून घ्यावे लागेल. या आकलनालाच 'पर्यावरणीय साक्षरता' असे म्हटले जाते. पर्यावरणीय साक्षरता महत्त्वाची आहे कारण, हे जीवनजाल समजावून घेऊन आपल्या आचरणात आणण्यावरच मानवाचे भवितव्य अवलंबून आहे.

आपल्या विद्यार्थ्यांना, तसेच उद्योगपती नि राजकीय नेत्यांना हे शिक्षण देणे अत्यंत गरजेचे आहे, असे काप्रा म्हणतात. वनस्पती या सूर्यापासून मिळणाऱ्या ऊर्जेचे, अन्नात रूपांतर करतात नि त्यातून पर्यावरणीय चक्राला सुरूवात होते. निसर्गातील वैविध्याची हमी मिळते, एका जाती-प्रजातीचा अन्नशेष हे इतरांचे अन्न असते, किंवा तीन अब्ज वर्षांपूर्वी सुरू झालेले जीवन हे परस्पर संघर्षातून नव्हे तर सहकारातून टिकून राहिले आहे. हे सारे पर्यावरणीय ज्ञान- पारंपरिक शहाणपण विद्यार्थ्यांना देणे हेच एकविसाव्या शतकातील शिक्षणाचे आद्य कर्तव्य ठरते.

पर्यावरणशास्त्राची तत्त्वे पूर्णांशाने ग्रहण करायची असतील तर जगाकडे पाहण्याच्या आपल्या दृष्टिकोणात बदल होण्याची गरज आहे. आपल्याला विश्वातील परस्पर संबंधांचा नि त्या संदर्भातच इतर सर्व गोष्टींचा विचार करायला हवा आहे. काप्रा असे म्हणतात की, पर्यावरणशास्त्र हे मूलतः या विश्वातील सर्व जाती-प्रजातींमधील परस्पर संबंधांचे शास्त्र आहे. आपण जेव्हा हे आकलन करून घेऊ तेव्हा पारंपरिक पाश्चात्यविज्ञान आणि शिक्षणाच्या विरोधातच आपली भूमिका निःसंदेहपणे तयार होते, ज्ञानाविषयीचीच एक नवीन विचारप्रणाली तयार होते. ज्ञानग्रहणविषयक शास्त्रात नि शिक्षणात ही नवीन विचारप्रणाली प्रस्थापित होऊ पाहत आहे. आता विश्व म्हणजे वेगवेगळया सुट्या भागांनी तयार झालेले यंत्र मानले जात नाही, तर विश्वातील विविध घटकांच्या परस्पर संबंधातून तयार झालेले एक जाळे आहे; यातील सर्व संरचना एकमेकांपासून विभक्त नाहीत, तर त्या एकजीव झालेल्या आहेत. आणि त्यामुळे स्वनियंत्रित अशी ही विश्वरचना तयार झालेली आहे. ज्ञानग्रहणशास्त्रातही आता, मानवी शरीर हे एक यंत्र आहे आणि मन ही शरीरापासून काही वेगळे अस्तित्त्व असलेली घटना आहे, असे मानले जात नाही.

आता असे मानले जाते, की मानवी शरीर, त्यातील प्रत्येक स्नायू, माणसाची रोगप्रतिकारक शक्ति आणि मेंदू हे सारेच एकत्रितपणे ज्ञानग्रहणाचे कार्य करतात, असेही लक्षात आले आहे, की मानवी उत्क्रांती ही (डार्विन म्हणतो त्याप्रमाणे) जगण्यासाठीच्या स्पर्धात्मक संघर्षातून नव्हे तर पुनरू त्पत्ती नि सततची नवनिर्मिती साकारणाऱ्या सहकारातून हो आलेली आहे.

साहजिकच, शिक्षणाचा आशय आता या शास्त्रीय नवज्ञानावर आधारित असा असावा लागेल. शिक्षण मेंदू-अभिमूख अशा असाव्या लागतील. अगदी बालवाडीपासून ते विद्यापीठीय पातळीपर्यंत शिक्षणाच्या आशय व पद्धतींतध्ये या दिशेने बदल अभिप्रेत आहेत. पर्यावरण हा आता एखाद्या शास्त्राचा विषय नाही तर तो संपूर्ण वैश्विक जीवनाला-त्याच्या अभ्यासाच्या सर्व शास्त्रांना-परिघात घेणारा असा विषय ठरलेला आहे. त्यामुळे या नव्या अंगाने, नव्या दृष्टिकोणातून हा विषय आत्मसात करण्याचीशिकविण्याची गरज निर्माण झाली आहे.

जेव्हा आपण हे सारे मुलांना शाळांतून शिकवू तेव्हा, त्यांना पर्यावरणाची केवळ माहिती मिळून चालणार नाही; त्यांना अनुभव मिळायला हवा. त्यासाठी शिक्षण वर्गाबाहेर पडावे लागेल. ते सागरावर, जंगलातून, मोकळया माळरानांतून आणि समाजव्यवहारातून द्यावे लागेल. नाहीतर आजच्यासारखे व्यवहारशून्य तज्ज्ञ (पर्यावरण) पदवीधरच निर्माण होतील. काप्रा म्हणतात की, आपल्या शिक्षणसंस्थांमधून आपण असे अनुभव दिले पाहिजेत की, त्यातून विद्यार्थ्यांचे निसर्गाशी भावनिक नाते जुळेल. यासाठी अर्थातच अधिक आशययुक्त अशी प्रकल्प-पद्धती वापरता येईल; ज्यात विद्यार्थी स्वतःपाहून, स्वतःअभ्यास करून सहकाऱ्यांबरोबर शिकत जातील.

काप्रा म्हणतात की, त्यांच्या मागील दहा वर्षांतील या कामाचा अनुभव असे सांगतो की, जीवनसातत्यासाठीचा शिक्षणाचा अनुभव घेण्यासाठी, संपूर्ण शाळेचे रूपांतर 'शिकणाऱ्या समुदायात' झाले पाहिजे. येथे विद्यार्थी, शिक्षक, व्यवस्थापक, पालक हे सर्वच एका परस्परसंबंधाच्या धाग्यात बांधले गेले पाहिजेत. त्यांनी एकत्र येऊन हे अनुभवाधारित शिक्षणाचे काम उभे करायला हवे. या व्यवस्थेत शिक्षण वरून खाली जाणार नाही तर इथे एकाचवेळी सर्वच शिक्षक बनतील नि त्याचवेळी सर्वजण विद्यार्थीही असतील. त्यांच्यात परस्परांमध्ये ज्ञानाची देवाण-घेवाण होत राहील. विद्यार्थ्यांचे शिक्षण यायोगे जीवनाभिमुख बनते. गांधीजींच्या बुनियादी शिक्षणाच्या जवळ जाणारा विचारच काप्रा येथे मांडताहेत. आणि त्याचवेळी, स्वतंत्र विचाराला आवाहन करणारा प्रश्न विचारण्यास उद्युक्त करणारा, असा आधुनिक रचनावादी शिक्षणाचा धागाही ते जोडून घेताहेत.

विद्यार्थी आपल्या कौटुंबिक नि सांस्कृतिक पार्श्वभूमीच्या आधारे अर्थाची रचना करत जातो, अशी शिकण्याची प्रक्रिया आहे, असेही काप्रा मानतात. हे सारे चिरायू जीवनसमाजाच्या निर्मितीच्या कळकळीने काप्रा मांडतात. कारण, लेखाच्या अखेरीस काप्रा म्हणतात, जीवनसातत्यासाठीचे शिक्षण हा असा उद्योग आहे की ज्यात आपले वर्ग, वंश, संस्कृतीचे भेद मावळतात. ही पृथ्वी हे आपले सर्वांचेच एकत्रित असे घर आहे; आणि आपल्या मुलाबाळांसाठी आणि त्यांच्या पुढच्या पिढ्यांसाठी एक चिरायू विश्व घडवणे हे आपणा सर्वांचे समान ध्येय आहे.

**पर्यावरण आणि धर्म**

ज्युडो-ख्रिश्चन संस्कृतीने, निसर्गोपासक असलेल्या पेगन संस्कृतीचा ऱ्हास करून निसगाचा ऱ्हास करणाऱ्या पाश्चात्य संस्कृतीचा मार्ग मोकळा करून दिला, असा आरोप अमेरिकन इतिहासतज्ज्ञ लिन व्हाईट या विदुषीने १९६७ मधे करून खळबळ माजविली. हाच विषय अलीकडेच (५ ते ७ सप्टेंबर २००४) मिलान (इटली)येथे, धर्मविषयक आंतरराष्ट्रीय परिषदेत पुन्हा एकदा उपस्थित करण्यात आला होता. धार्मिक नेते, शिक्षणतज्ज्ञ, सरकारी अधिकारी आणि स्वयंसेवी संस्थांचे प्रतिनिधी यावेळी उपस्थित होते. यावेळी, जगातल्या प्रमुख धर्मांनी पर्यावरणाचा ऱ्हास रोखण्यासाठी काहीही केले नाही, असे मत जर्मनीतील चर्चच्या प्रतिनिधीने व्यक्त केले आणि हा विषय चर्चेत आला. यावर बरीच उलटसुलट मते मांडण्यात आली; आणि उपस्थितांपैकी अनेकांचे मत पर्यावरणीय ऱ्हासासाठी धर्माला दोषी ठरविण्यात येऊ नये, असे होते. हिंदू, बौद्ध आणि इस्लाम धर्मातील तत्त्वे सध्याचा पर्यावरणीय ऱ्हास रोखू शकतात, असेही मत मांडण्यात आले. निसर्गाचे रक्षण करून सातत्यपूर्ण विकासाची संकल्पना रूजविण्यासाठी विविध धर्म कशाप्रकारे स्वतःमध्ये परिवर्तन घडवून साहाय्यभूत ठरू शकतात, त्याचा विचार करण्यात यावा, असेही मत मांडण्यात आले.

❖